# महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ
**MAHARASHTRA UNIVERSITY OF HEALTH SCIENCES**

म्हसरुळ, दिंडोरी रोड, नाशिक - ४२२ ००४

Mhasrul, Dindori Road, Nashik – 422 004.

**Phone:** 0253-2539175 / **EPABX:** 0253-2539100 - 300 / **Fax:** 0253-2539176

**E-mail:** pro@muhsnashik.com / **Web:** www.muhsnashik.com


क्र. मआविवि/पीआर/८६३/२०११ — वृत्त प्रसिध्दीसाठी — दि.०३ ऑक्टोबर २०११

## संस्थाचालकांसाठी मार्गदर्शन बैठकीचे आयोजन
## महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठातर्फे नवीन महाविद्यालये वाढीव प्रवेश क्षमता प्रक्रियेस प्रारंभ

**नाशिक (दि.०३)** - महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठातर्फे शैक्षणिक वर्ष २०१२-१३ करीता नवीन महाविद्यालये सुरु करणे, पदव्युत्तर अभ्यासक्रम सुरु करणे, वाढीव प्रवेशक्षमता वाढ या प्रक्रियेबाबत इच्छूक संस्थाचालकांना मार्गदर्शन करण्यासाठी विद्यापीठातर्फे नाशिक येथे एका विशेष मार्गदर्शनपर (Counselling) बैठकीचे दि. ०४ ऑक्टोबर २०११ रोजी आयोजन करण्यात आले असल्याची माहिती विद्यापीठाचे मा. कुलगुरु प्रा.डॉ. अरुण जामकर यांनी दिली.

विद्यापीठाचे मा. कुलगुरु प्रा.डॉ. अरुण जामकर यांनी सांगितले की, विद्यापीठातर्फे सन २०१२-१३ ते २०१६-१७ या कालावधीसाठी आरोग्य विज्ञानाशी संबंधीत नवीन महाविद्यालये सुरु करण्यासाठी परवानगी देण्याबाबतचे धोरण ठरविणारा यथार्थदर्शी चौथा बृहत आराखडा तयार करण्यात आला आहे. विद्यापीठाच्या बृहत आराखडयाच्या अनुषंगाने दरवर्षी नवीन महाविद्यालये तसेच वाढीव प्रवेशक्षमता आदी बाबींकरीता प्रक्रिया राबविण्यात येत असल्याचे त्यांनी सांगितले.

याबाबत अधिक माहिती देतांना विद्यापीठाचे कुलसचिव डॉ.आ.ना. सूर्यकर यांनी सांगितले की, या मार्गदर्शन बैठकीत प्रस्ताव सादर करणे संबंधी सूचना, प्रस्तावासोबत जोडावयाची आवश्यक कागदपत्रे, विविध आरोग्य विद्याशाखांच्या महाविद्यालयांमध्ये लागणारा अध्यापक वर्ग, शैक्षणिक सुविधा आदींबाबत उपस्थितांना मार्गदर्शन केले जाणार असून इच्छूक संस्थाचालकांनी / महाविद्यालयाच्या प्राचार्यांनी किंवा त्यांच्या प्रतिनिधींनी या बैठकीस उपस्थित रहावे. याकरिता विद्यापीठातर्फे दि. ०४ ऑक्टोबर २०११ रोजी विद्यापीठ सभागृहात दुपारी ०२.०० वा. मार्गदर्शनपर (Counselling) बैठकीचे आयोजन करण्यात आले आहे. सदर प्रक्रियेबाबत अधिक माहितीसाठी विद्यापीठाच्या www.muhsnashik.com या संकेतस्थळास भेट द्यावी असे आवाहन विद्यापीठातर्फे करण्यात आले आहे.

Suryakar

कुलसचिव